Dada Damle (dadadamle@gmail.com)

=============================================================

सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.

=============================================================

राशिभविष्य - नोव्हेंबर, २०२३.

(१) मेष - या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी याच राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल- राहू असे तीन ग्रह असून येथील राहू व वक्री हर्षल पूर्णपणे प्रतिकुलच होतील व राहूमळे सतत अपमान झाल्यास मनात सूडभावना प्रबळ होईल. शिवाय त्याच्यामुळे वातविकाराचा आजार होणे संभवते. येथील हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होईल. कोणाचाही धाक, दडपण, भीती असह्य होईल. अशा परिस्थितीत तो शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त असला तरी वक्री असल्यामुळे तो किती प्रमाणात अनुकुल होईल ते सांगता येणे शक्य नाही. तसेच येथील गुरुही लेखन व अन्य बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणारा असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगतिकारक व यशदायक होणे संभवत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत शुक्र असून तो या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत अधिक प्रगती करण्यास व कलाकार म्हणून समाजात स्थान मिळू देण्यास अनुकुल होणार् नाही. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत रवि -अस्तंगत मंगळ -केतू असे तीन ग्रह असून येथील रवि आणि अस्तंगत मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे तिन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य होणे, हाडमोड होणे, नियोजित कार्यात अपयश येणे, दुःख होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, भागीदारीत

व्यापार-व्यवसाय असणारांची भागीदारी तुटण्याची वेळ येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येऊ शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत असलेला बुध महिन्याच्या उत्तरार्धात वक्री होत असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुलच होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊन यश मिळेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत गेल्यावर प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो अनुकुल व लाभदायक असला तरी त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता त्रस्त करतील व त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेशअथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(२) वृषभ - या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत शुक्र असून तो या राशीच्या कसल्या तरी कलेची मनापासून आवड असणाऱ्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल होईल व प्रयत्नपूर्वक सराव करून प्रगती झाल्यास सुखसमाधानच लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत रवि -केतु -अस्तंगत मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि -अस्तंगत मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील, पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावरही अनारोग्यकारकच होईल. येथील अस्तंगत मंगळ महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल. पण तो अस्तंगत असल्यामुळे

फारसा अनारोग्यकारक व वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होणे संभवत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत असलेलेला केतू संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आचारविचार उच्च होतील, मन उदार होईल, सहकार्य लाभेल, जन्मजात गुणांचा विकास होईल, व क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो वक्री होत आहे. त्यामुळे तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे, दुःख होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून तो कायदा, अन्य चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री नेपच्यून असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त शक्यता दिसते. शिवाय कुमार्गी मित्रापासून मनस्ताप होणे संभवते. तसे घडल्यास नैराश्य येईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत राहू-वक्री गुरु-वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते. पण आचरण ढोंगी, दिखाऊ असे कराल. येथील वक्री हर्षल प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल, शत्रुत्व निर्माण होणे संभवते व तो अपघातभयकारकही होणे संभवते. येथील वक्री गुरुमुळे कौटुंबिक त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय तो अध्यात्म, समाजसेवा असे कार्यक्षेत्र असणारांच्या कार्यातही अडचणी, अडथळे निर्माण करण्याची शक्यता दिसते. . श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(३) मिथुन - या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे गृहसौख्य लाभेल व ज्यांची शेतीवाडी आहे अशा मंडळींना त्यापासून लाभ होईल. तसेच ऐषाराम लाभेल. या

राशीच्या पंचम स्थानी तुला राशीत रवि-बुध -अस्तंगत मंगळ व केतू  असे चार ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवी -बुध-मंगळ या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे तिन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य होणे संभवते  पण रवि महिन्याच्या उत्तरार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू  पराभूत होतील.बुधामुळे संतती व स्त्रीपासून मनस्ताप होणे संभवते. या  राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत शनि असून तो प्रतियुलच होईल व त्याच्यामुळे विचित्र आजाराचे   अनारोग्य होणे, मानसिक दुःख  सहन करावे लागणे संभवते.तसेच तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल असे होईल; पण तो मनोवैज्ञनिक  व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू -वक्री गुरु -वक्री हर्षल असे तीन ग्रह असून महिना अखेर वक्र गतीने या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहे. पण या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत असलेले वक्री गुरु आणि वक्री हर्षल सहजासहजी अनुकूल, प्रगतीकारक, यशदायक व लाभदायक
होणे संभवत नाही.  श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची आणि श्रीदुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मनःशांति लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे  आणि “श्रीदुर्गा देवी स्तोत्रा”चे  पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः:शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये”नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(४) कर्क -या राशीच्या तृतीय स्थानी  कन्या राशीत शुक्र असून तो अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ होणे संभवते, तर काही मंडळींचा सन्मान होणे, काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. त्याशिवाय धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत रवि - अस्तंगत मंगळ - केतू असे तीन

ग्रह असून येथील रवी आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात हे दोन्ही ग्रह प्रतिकूलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य होणे, दुःख होणे, कौटुंबिक त्रास असह्य होणे, प्रिय जनांपैकी काहींशी दुरावा निर्माण होणे, संततीविषयक समस्या त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी प्रथमपासून बुध असून तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे केवळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहातच तो अनुकूल व लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुला राशीत असलेला केतू महिन्याच्या अखेरीस वक्र गतीने या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत जात आहे. त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ या स्वराशीत शनि असून त्याच्यामुळे दैन्य, अनारोग्य सहन करावे लागेलसे दिसते. शिवाय तो अपघातकारकही असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत नेपच्यून व राहू असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून अध्यात्मात रस असणाराना अनुकूल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू, वक्री गुरु व वक्री हर्षल असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह अनुकूल होतील व उच्च बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक होतील; पण ते वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे संभवत नाही. येथील राहू महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम् आदितीये नम :” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम् बृहस्पतये नमः “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम् सर्पाय नमः“ तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(५) सिंह - या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी तुला राशीत रवि - अस्तंगत मंगळ - केतू असे तीन ग्रह असून येथील रवि-मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकूल होतील व त्यांच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील, त्यातून काही मंडळीना बढती मिळेल, काहींचा सन्मान होईल; तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकूलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास, असमाधानकारक घटना घडणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत असलेला केतू महिन्याच्या अखेरीस वक्र गतीने या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो अनुकूल होईल व त्याच्यामुळे मित्रसुख, गृहसौख्य मिळू शकेल; पण धननाश होणेही संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा बुध या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत जात आहे. त्या काळात संतती-स्त्रीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता वाटते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील, पण या राशीच्या विवाहेच्छूंना विवाहयोग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून जलभय, विषभयकारक असल्यामुळे जपावे लागेल. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू, वक्री हर्षल आणि वक्री गुरु असे तीन ग्रह असून येथील राहू अनारोग्यकारक होईल. तसेच येथील वक्री गुरु व वक्री हर्षल हे दोन्ही ग्रह उच्च बौध्दिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना अनुकुल असले तरी ते वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रागतिकारक होणे संभवत नाही. पण हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येणे संभवते. येथील राहू महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णू सहस्र नाम स्तोत्राचे"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम् पितराय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम् भगाय

नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम् आर्यमे नमः “तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(६) कन्या - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत रवि, अस्तंगत मंगळ आणि केतु असे तीन ग्रह असून पैकी रवि आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. तसेच येथील केतु महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात रवि- मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील, धनलाभ होईल व काही मंडळींचा सन्मान होईल. धनस्थानी असलेल्या केतुमुलेही आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. पण त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत गेल्यावर मित्रसुख व गृहसौख्य लाभेल. पण धननाश होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे गैरसमजुतीने भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. पण तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत नेपच्यून असून तो वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू, वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे तीन ग्रह असून राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. जपा. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. येथील हर्षल अपघातभयकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. येथील गुरु अचानक धनलाभ होण्यास अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने निश्चित होईलच याची खात्री देता येत नाही. येथील राहू महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर शिव शंकराची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज

सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा.त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम् आर्यमे नमः “ तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त  आहे त्यांनी “ओम् सूर्याय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी ओम् त्वष्टे नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(७) तुळा -या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि-अस्तंगत मंगळ आणि केतु असे तीन ग्रह असून येथील रवि  आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. येथील केतु सुखदायक होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्याने सतत सावधानतेने मार्गक्रमण करणे अगत्याचे होईल. हा केतु महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत जात आहे.  या राशीच्या प्रथम स्थानी असलेले रवि-मंगळ महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकूलच होतील व त्यांच्यामुळे शरीरपीडा, अनारोग्य, चिंता भय, मनस्ताप, आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो धनदायक होईलच; पण तो मनस्तापदायक होणेही संभवते.  या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव संशयी, स्वार्थी, व्यवहारी असा घडण्याची शक्यता दिसते. पण  चिकाटीच्याफसवणूक गुणामुळे बौद्धिक समस्या सोडविण्यास तो अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे उगीचच एखादी आजार भावना किंवा काल्पनिक चिंता अस्वस्थ करील.  शिवाय त्याच्यामुळे  फसवणूक होण्याची शक्यताही दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू-वक्री गुरु-वक्री हर्षल असे तीन ग्रह असून येथील राहू व हर्षल विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणतील. राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. येथील वक्री गुरु सर्व प्रकारे अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने किती प्रमाणात अनुकूल, सुखकारक व लाभदायक होईल ते सांगणे कठीण दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला राहू महिन्याच्या अखेरीस वक्र गतीने या राशीच्या षष्ठ स्थानी  मीन राशीत जात आहे.  श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकूल होईल व

मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम् त्वष्टे नमः " तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम् वायवे नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः " तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(८) वृश्चिक - या राशीच्या व्यय स्थानी तुळा राशीत रवि- अस्तंगत मंगळ-केतू असे तीन ग्रह असून येथील रवि-मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, दुःख, चिंता, अपयश, अर्थहानी, अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. व्यस्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव चंचल, लहरी, अस्थिर असा होणे संभवते. या राशीच्या प्रथम (लग्न) याच राशीत प्रथमपासून बुध आहेच. पण तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीची बाधा होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. तसेच येथील नेपच्यूनमुळे स्वभाव अत्यंत भावनाशील होईल व पण तो अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री गुरु-वक्री हर्षल-राहू असे तीन ग्रह असून येथील राहू अनारोग्यकारकच होईल; पण ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे तो लाभदायक होईल. येठील गुरु आरोग्यदायक असला तरी तो वक्री असल्यामुळे मधून मधून किरकोळ अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल अनारोग्यकारकच असून त्याच्यामुळे डोकेदुखी, मेंदूविकार अशा प्रकारचा आजार होणे संभवते. या राशीच्या, लाभस्थानी कन्या राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून त्यांच्यामुळे सर्व सुख, ऐशाराम,

धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दरारोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्री गणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम् इंद्राग्रये नमः "तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम् मित्राय नमः" तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम् इंद्राय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(९) धनु - या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत रवि- अस्तंगत मंगळ -केतू असे तीन ग्रह असून येथील रवि-मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यय स्थानी वृश्चिक राशीत आत आहेत. तसेच या महिना अखेरीस येथील केतु वक्र गतीने या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि-मंगळ महिन्याच्या पूर्वार्धात अनुकूल होतील व व्यावसायिक दृष्टया लाभदायक होतील.पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व अनारोग्यकारक व मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्यय स्थानी प्रथमपासून बुध आहेच. पण तोही प्रतिकूल होणेच संभवते. हा बुध महिना अखेरीस या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहे. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. पण त्याच्यामुळे काही मंडळींना मनपसंत नोकरी किवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती वातावरणात घोटाळे, गैरसमज अशापैकी कारणानी मिळणाऱ्या सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू-वक्री गुरु -वक्री हर्षल असे तीन ग्रह असून राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. पण दलाली, कमिशनवर व्यवसाय असणाराना तो लाभदायक होईल. हा राहू महिना अखेरीस वक्र गतीने या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत जात आहे. येथील गुरु -हर्षल बौद्धिक, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असले तरी ते वक्री असल्यामुळे सहजासहजी अपेक्षित प्रगती होणे व अपेक्षित यश मिळणे संभवत नाही. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत शुक्र असून तो

नोकरी-व्यवसाय असणारांना प्रतिकूल होईल नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील.

श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम् निऋतये नमः "तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम् उदकाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम् विश्वेदेवाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(१०) मकर - या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून तो प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घडण्याची शक्यता दिसते. तसेच त्याच्यामुळे सतत आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची तर काहींना जलप्रवासाची संधी मिळेल. त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व अध्यात्म, गूढ संशोधन अशा क्षेत्रात कार्यरत असणाराना तो अनुकूल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू, वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे तीन ग्रह असून. येथील राहू प्रतिकुल असून त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते.तसेच जीवन कष्टदायक होऊ शकेल. येथील वक्री हर्षलमुळे स्वभाव तापट, हेकट असा होईल व त्यामुळे कोणाशी पटणार नाही, भांडणे होतील व सुखसमाधान लाभणार नाही.तसेच येथील गुऊ वक्री असल्याने मिळणाऱ्या सर्व गोष्टीत अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत शुक्र असून तो या राशीच्या साहित्यप्रेमी मंडळींना व कलावंतांना अनुकूल. प्रगतीकारक व लाभदायक होईल. या राशीच्या दशम स्थानी तुला राशीत रवी,अस्तंगत मंगळ व केतू असे तीन ग्रह असून येथील रवी - मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवी महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायकच होईल. पण मंगळ प्रतिकूल असल्यामुळे नोकरी-व्यवसायात मनस्तापदायक घटना घडणे संभवते. तसेच संतती सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी

**वृश्चिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो अनुकूल होईल. श्रद्धा असेल तर. " श्रीशिवशंकराची " व "श्रीहनुमानाची " उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम् विश्वेदेवाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम् विष्णवे नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम् वसवे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

**(११ ) कुंभ - या राशीच्या प्रथम (लग्न )स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे दैनंदिन जीवनात प्रतिकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता जाणवते. तसे झाल्यास गहरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री गुरु, वक्री हर्षल आणि राहू असे तीन ग्रह असून येथील गुरु - हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकूल असले तरी ते वक्री असल्याने अडथळे, अडचणी येणे संभवते. त्यामुळे सहजासहजी आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती होणे व यश प्राप्त होणे संभवत नाही. पण येथील हर्षलमुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. या स्थानी असलेला राहू अनुकूल व सुखदायक असला तरी त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत शुक्र असून त्याच्यामुळे विविध प्रकारे अर्थलाभ होण्याची शक्यता दिसते.पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुला राशीत रवी, अस्तंगत मंगळ व केतू असे तीन ग्रह असून येथील रवि -मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात काही प्रमाणात तर महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायाच्या बाबतीत पूर्णपणे अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होतील. पण नोकरीत मंगळामुळे सतत संघर्ष करावे लागल्यास, नोकरीत वरिष्ठाणशी न पटल्यास नोकरी सोडून देण्याचा विचार कराल. पण तसे करू नका. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे हातून ढोंगी आचरण होईल व पापकर्म प्रवृत्ती**

प्रबळ होईल. जपा. या राशीच्या दशम स्थानी वृशिक राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो रवीसह असल्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर "शिव शंकराची व श्रीहनुमानाची " उपसना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी मनापासून श्रद्धेने "हनुमानचालीस स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम् वसवे नामः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम् वरुणाय नामः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वभाद्रपदा आहे त्यांनी "ओम् अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(12) मीन - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मानसिक संवेदना शीघ्र होतील; व मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी गहरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री गुरु, वक्री हर्षल व राहू असे तीन ग्रह असून राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. वक्री हर्षलमुळे अविचारी आचरण घडेल, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे हेही समजणार नाही. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील गुरु अनुकुल व सुखकारक असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी सर्व काही मनासारखे घडेलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत शुक्र असून वैवाहिक जीवनातील सुखसमाधन मिळू शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत रवि, अस्तंगत मंगळ व केतू असे तीन ग्रह असून तेथील रवि-मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. अनारोग्य होईल, स्वभाव मानी, अहंकारी होईल. येथील मंगळ अस्तंगत असल्यामुळे त्याच्यामुळे निश्चित असे काय घडेल ते सांगणे कठीण आहे. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला केतु अनारोग्यकारक होईल, त्याच्यामुळे अपघात भय असल्याने सतत सावधानतेने

आचरण करणे अगत्याचे होईल. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून बुध आहेच. तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी  कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल.      श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्र”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यानी “ओम् अजैकचरणाय नामः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  उत्तराभाद्रपदा आहे त्यानी “ओम् अहिरबुधन्याय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम् पूषाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

================================================================

राशिभविष्य - डिसेंबर, २०२३.

(१) मेष - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून गुरु अनुकूल असला तरी वक्री असल्यामुळे सर्व काही  अपेक्षेनुसार घडेलच याची खात्री देता येत नाही.  तसेच येथील हर्षल मुळातच  चंचल, अस्थिर, लहरी, विक्षिप्त आणि अधिकारशाही स्वभावाचा आहे. त्यामुळे या मंडळींना कोणाचा धाक, दडपण सहन होणार नाही.  असे असले तरी तो गुरूसह असल्यामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकूल होऊ शकेल.  या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत केतु असून तो अनुकुल असून ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना तो लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत शुक्र असून तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखास अनुकूल होईल व महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात त्याच्यामुळे अचानक धनलाभ होणे संभवते.  या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत रवि, अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या

राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकूल व अनारोग्यकारकच होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्या स्वभाव मानी व आदर्श आचरणाचा असा होईल. अस्तंगत मंगळामुळे अनारोग्य व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे उत्तम वक्तृत्त्व आणि लेखन कौशल्य असणारांना काळ अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत शनि असून तो कायदा व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून राहूमुळे हितशत्रूपासून रक्षण होईल, पण आप्टेष्टांत वाद, भांडणे होणे संभवते. येथील नेपच्यूनमुळे असली तरी चिंता अस्वस्थ करील व त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी ओम् अश्विनीकुमाराभ्याम नमः"तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी " ओम् यमाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम् अग्नये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(२) वृषभ - या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून गुरूमुळे विरक्ती येईल, हर्षलमुळे अपघात भय असून सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंगाशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत केतू असून तो प्रतिकूल होईल व त्याच्यामुळे दुःख सहन करा लागेल, नको ते करण्याची इच्छा प्रबळ होईल. या राशीच्या सप्तम स्थानी तुला राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल होईल. पण कलेत प्रसिद्धी मिळणे संभवत नाही. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्या काळात तो वैवाहिक जीवनातील सुखास अनुकूल असला तरी त्या स्थानी प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असल्यामुळे अपेक्षित सुखसमाधान

मिळणे संभवत नाही. पण येथील रवि केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत जात आहे. त्या काळात तो प्रतिकूल व अनारोग्यकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव हटवादी, अहंकारी, असा होईल. पण तो कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांना व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना अनुकूल, प्रगतिकारक व लाभदात्क होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय ज्यांच्या हाती अधिकार पद आहे आशापैकी काहींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. जपा. येथील नेपच्यूनमुळेही संततिसुखात बाधा येऊ शकेल. तसेच फसवे, कुमार्गी मित्र सहवासात आले तर नुकसानच होईल. शिवाय आर्थिक लाभात विलंब, अडचणी निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिव शंकराची उपासना व हनुमान उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम् अग्नये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम् ब्रह्माय नमः' तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम् सोमसोमाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(३) मिथुन - या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत केतु असून त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कलावंतांना प्रगतिकारक होईल. तसेच लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावरही तीच स्थिती राहील. या राशीच्या षष्ठ स्थानी येथील वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी रवि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल, पण मंगळासह असल्याने अनारोग्यकारक होणेही संभवते. येथील मंगळ अस्तंगत असला तरी तो अनारोग्यकारकच होईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत गेल्यावर तो

फारसा अनुकुल नसला तरी तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो अनुकूलच होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत शनि आहेच. हा शनि कायदा, तत्त्वज्ञान अभ्यासास अनुकुल होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत राहू आणि नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे काही मंडळींना सत्ता, काहींना आधिकार मिळू शकेल; तर क्वचित कोणाचा सन्मानहोनही संभवते. पण येथील नेपच्यूनमुळ अंगी आळस, जडत्व निर्माण होईल व वृत्ती साहसहीन होईल. त्यामुळे नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून गुरूमुळे जिवाभावाचे मित्र मिळतील, मोठ्या लोकांच्या ओळखी होतील व त्यापासून लाभदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. पण येथील नेपच्यून प्रतिकूल होईल व त्याच्यामुळे आर्थिक लाभात अडचणी, अडथळे निर्माण होतील, वाईट मित्रांमुळे आर्थिक नुकसान होईल व संततीसुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना व श्रीहणुमानाची उपासना औकुळ होईल, व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम् सोमसोमय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम् नमः शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम् आदितीये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(४) कर्क - या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत केतु असून त्याच्यामुळे जे कर्तृत्ववान ठरतील त्यांचा सन्मान होणे संभवते. पण या राशीच्या सर्वांना कसले तरी मानसिक दुःख असावे, असे वाटते. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सर्व प्रकारे गृहसौख्य लाभेल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यावेळी सर्व प्रकारच्या कलावंतांना आपापल्या आवडत्या कलेत सहज प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्यांच्या उत्तरार्धात या राशीच्या

षष्ठ स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात बौद्धिक अहंकार प्रबळ होईल. व महिन्याच्या उत्तरार्धात तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. तसेच  या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते.या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो अनुकूल होईल. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत शनि  असून  तो दुःख,  दैन्यकारक होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुकूल होतील. राहूमुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना सभाधीटपणा प्राप्त होईल. येथील नेपच्यूनही अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना अनुकुल होईल.  काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होणार असले तरी ते वक्री असल्यामुळे आपल्या कार्यात सहजासहजी प्रगती करणे शक्य होणार नाही.श्रद्धा असेल तर “श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना “ अनुकूल होईल व मनःशांती लाभेल.   त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम् अदितीये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम् बृहस्पतये नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम् सर्पाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(५) सिंह- या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत शुक्र असून त्याच्यामुळे भावंडप्रेम मिळू शकेल. शिवाय आवडत्या कलेत प्रगती करणे व आनंद घेणे सहज शक्य होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्या काळात तो सर्व प्रकारे सुखकारकच होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्यांच्या उत्तरार्धात  या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो

महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर बुधासह असल्यामुळे बौद्धिक अहंकार प्रबळ होईल. पण संततिसुख लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असेल मंगळ अस्तंगत असला तरी प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे सर्वकाही मंदपणे घडून येईल. मनोवृती शांत व विचारी होईल, पण या राशीच्या विवाहेच्छूंना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून राहूमुळे या राशीच्या काही अधिकारी मंडळींना वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह अनावर होईल. जपा. येथील नेपच्यून जलभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थायी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अध्यात्म व गूढ संशोधन कार्याची आवड असणाराना अनुकूल होतील. पण ते वक्री असल्यामुळे (सहजासहजी अपेक्षित असे घडणे संभवत नाही. पण काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळू शकेल. श्रद्धा असेल तर “भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान करा. झाल्यावर मनापासून श्रद्धेने “विष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम् पितराय नम:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम् भगाय नम:” तारक मंत्राचा आणि यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम् आर्यमे नम:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(६) कन्या - या राशीच्या प्रथम(लग्न स्थानी) याच राशीत केतू असून तो वाहन धोकादायक असल्याने वाहन सतत सावधानतेने चालवा. चालत जाताना विशेष काळजी घ्या. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत शुक्र असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात सुखकारक व धनदायकच होईल. भावंड प्रेम मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या

पूर्वार्धातच अनुकूल होईल व त्याच्यामुळे हातून काही कर्तृत्वडायक घटना घडण्याची शक्यता जाणवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनारोग्यकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला मंगळ अस्तंगत असा तरी त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनू राशीत प्रथमपासून बुध असून तो सुखकारकच होईल. या राशीच्या षष्ठ स्थायी कुंभ राशीत शनि असून तो अनारोग्यकारकच होईल व त्याच्यामुळे भांडणे होणे, कसली तरी चिंता त्रस्त करणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखसमधानात बाधा निर्माण करतील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षल अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. पण येथील गुरु वक्री असला तरी त्याच्यामुळे काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर "शिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम् आर्यमे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम् सूर्याय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम् त्वष्टे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(७) तुळा - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधन मिळू शकेल. तसेच त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी धनू राशीत आत आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून

अस्तंगत मंगळ आहेच. अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट करावे लागतीलसे दिसते. अशा परिस्थितीत अविचाराने खर्च झाल्यास परिस्थिती बिकट होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत शनी असून तो कायदा आणि चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहू ज्यांचा परजातिधर्मियांशी व्यवसायिक संबंध आहे अशांना अनुकूल व लाभदायक होईल. पण येथील नेपच्यूनमुळे उगीचच एखादी आजार भावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या अप्तम स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततीसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी, खर्चिक असा घडणे संभवते. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची“ व “श्रीहनुमानाची“ उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज स्काळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम् त्वष्टे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम् वायवे नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम् इंद्राग्नये नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(८) वृश्चिक - या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत केतु असून तो कुलदैवताच्या उपासनेस अनुकूल होईल. पण फसवे मित्र असतील तर त्यांच्यापासून दूर राहा. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत शुक्र असून तो प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे नेत्रपीडा, प्रेमविवाह होणे संभवते. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच. राशीत येत आहे. तेव्हा वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. आवडत्या कलेत आनंद लुटता येईल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्यांच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी धनु राशीत

जात आहे. अशा परिस्थितीत रवि संपूर्ण महिन्याच्या काळात उदार पण खर्चिक मनोवृत्तीचा होणे संभवते. स्वभाव अहंकारी होईल व अनारोग्य होणेही संभवते. मंगळ अस्तंगत असला तरी त्याच्यामुळे स्वभाव संतापी, अहंकारी, हट्टी असा होईल. या राशीच्या धनस्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे प्रभावी वक्तृत्व कला प्राप्त होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींच्या मातृसुखात बाधा निर्माण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे गृहसौख्यातही बाधा निर्माण होणे शक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहू दलाली व्यवसाय असणाराना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक, सांसारिक व संततीसुखात बाधा तेणे संभवते.  गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. पण येथील नेपच्यूनमुळे काही मंडळींना दैवी शक्ती, वाचाशक्ती, कल्पनाशक्ती तर क्वचित कोणास अंतर्ज्ञानशक्ती प्राप्त होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून गुरूमुळे काही मंडळींना पोटविकाराचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते.तसेच येथील हर्षलमुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. श्रद्धा असेल तर “श्रीगणेश “ व “श्रीहनुमान “उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम् इंद्राग्नये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम् मित्राय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम् इंद्राय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(९) धनू - या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत शुक्र असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या व्ययस्थायी वृश्चिक राशीत जात आहे. अशा परिस्थितीत त्याच्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात आर्थिक लाभ, संततीसुख मिळेल. शिवाय मित्रपरिवारामध्ये वाढ होणेही संभवते. पण या राशीच्या व्यस्थानी वृश्चिक राशीत रवि आणि अस्तंगत मंगळ असल्यामुळे हे दोन्ही ग्रह प्रतिकूल असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते.  शिवाय

डोळ्याचे अनारोग्य होणेही संभवते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीचा प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. या राशीच्या लग्न स्थानी याच राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे आकलन शक्ती, स्मरणशक्ती प्राप्त होईल व बुद्धी अधिक चौकस होईल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे स्वभाव शांत राहील, स्वकर्तृत्वाने भाग्योदय होईल; पण त्याच्यामुळे काहीही कारणाने भावंड सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह प्रतिकूलच होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री गुरु आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु काही प्रमाणात शैक्षणिक प्रगतीस व मर्दानी खेळातील प्रगतीस अनुकुल होईल. तसेच येथील वक्री हर्षल गूढ संशोधन कार्यास काही प्रमाणात अनुकूल होईल. पण त्याच्यामुळे संततीसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मी अस्वस्थ करील. पण मनावर ताबा ठेवून आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करा. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकूल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम् निऋतये नमः " तारक मंत्राचा, यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम् उदकाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र. उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम् विश्वेदेवाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(१०) मकर - या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे अपेक्षित अर्थलाभासाठी अपार कष्ट करावे लागतील. शिवाय त्याच्यामुळे दात, डोळे यांचे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहू सर्व प्रकारे अनुकूलच होईल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. येथील नेपच्यून अध्यात्म व गूढ संशोधन यांची आवड असणाराना अनुकुल व प्रगतिकारक होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाची तर काहीना परदेशवारीची संधी मिळू शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह

असून येथील गुरूमुळे काही प्रमाणात गृहसौख्य मिळू शकेल. पण येथील हर्षल पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, कशातही सुखसमाधान लाभणार नाही, शिवाय त्याच्यामुळे स्वभाव तापट, हेकट होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत केतू असून त्याच्यामुळे हातून ढोंगी आचरण होईल; पण प्रत्यक्षात आतून पापप्रवृत्ती प्रबळ होईल. जपा. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारे अनुकुल व सुखकारकच होईल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत जात आहे . त्या काळात तो सर्व प्रकारे अनुकल व लाभदायक होणार असला तरी या लाभस्थानी प्रथमपासून रवि व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यस्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकूल होईल व मनाविरुद्ध घटना घडतील. लाभस्थानी असलेल्या मंगळामुळे संततीसुखात बाधा येणे संभवते. तसेच त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, व कष्ट,दगदग सहन करूनच अर्थलाभ होईल. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत असलेला बुध महिन्याच्या पूर्वार्धात गूढ अभ्यासास अनुकूल होईल. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा” चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम् विश्वेदेवाय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम् विष्णावे नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम् वसवे नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(११) कुंभ - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि असून त्याच्यामुळे प्रतिकूल परिस्थिती निर्माण होईल व परिणामतः गहरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून राहूमुळे कुटुंबात वाद,भांडणे होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे व याच स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळ आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हे

दोन्ही ग्रह शैक्षणिक व उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणाराना काही प्रमाणात शैक्षणिक प्रगतीस अनुकूल होईल; पण ते वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगतिशील व यशदायी होणे संभवत नाही. शिवाय येथील हर्षलमुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत केतू असून तो अनारोग्यकारकच होईल. शिवाय त्याच्यामुळे प्रापंचिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच तो अपघात भयकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत शुक्र असून तो महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत होईल व जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुलच होईल व संततिसुख मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि व अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकूल, या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काहींना अधिकारपद मिळू शकेल. काहींचा सन्मान होणे संभवते. शिवाय अर्थलाभ होणे, इच्छाआकांक्षा पूर्ण होणे संभवते.या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत असलेला मंगळ प्रतिकुल होईल पण तो अस्तंगत असल्यामुळे फारसा मनस्तापदायक होणे संभवत नाही. यास राशीच्या लाभस्थानी धनु राशीत असलेला बुध विशेषतः व्यापारी मंडळीना अनुकूल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान. करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम् वसवे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम् वरुणाय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यानी “ओम् अजैकचरणाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(१२) मीन - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे व्यक्तिमत्त्व प्रभावी होणार असली तरी पदोपदी अपमान सहन करावे

लागण्याची शक्यता जाणवते. असे घडले तर सोबत असलेल्या नेपच्यूनमुळे मानसिक संवादना शीघ्र होतील व लगेच नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री गुरु व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील गुरु समाजसेवेची मनापासून ओढ असणारांना काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण येथील हर्षलमुळे आर्थिक संकटे येणे संभवते. शिवाय आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अकारण अपमान होत आहे, हेही समजणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत ओढ केतु असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच वाममार्ग धन मिळविण्याची ओढ अस्वस्थ करील व त्यामुळे सतत अपमान होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुला राशीत शुक्र असून त्याच्यामुळे धनलाभ होणे संभवते. ज्याच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. त्या काळातही तो साहित्य, कलापोषक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत प्रथमपासून रवि आणि अस्तंगत मंगळ असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात त्याचा स्वभाव मान होईल व आचरण आदर्श प्रकारचे असेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो राजयोगकारक होईल व या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काही मंडळींना अधिकार पद मिळू शकेल; तर काहींचा सन्मान होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत प्रथमपासून बुध आहेच. त्याच्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना तो अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यस्थानी कुंभ राशीत शनि असून त्याच्यामुळे घरीदारी प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेया"ची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्र"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यानी "ओम् अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभद्रपदा आहे त्यांनी "ओम् अहिर्बूधन्याया नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम् पूषाय नमः" तारक मंत्राचा. १०८ वेळा जप करावा.

============================================================